डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठ, दापोली
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
सडवे विभाग

जा. क्र. मसंके/सडवे/ दरपत्रक/156/ /२०२३

दिनांक : 15 DEC 2023

# नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत सडवे विभागाच्या पहारेकरी शेडमध्ये ग्लेझड टाईल्स बसविणे, कोटा टाईल्स बसविणे आणि भीतीना रंग काढणे इ. इमारत दुरुस्तीची कामे ठेक्यावर करण्यासाठी ठेकेदारांकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरची कामे दिनांक ०४.०१.२०२४ ते दिनांक २३.०१.२०२४ या कालावधी मध्ये करावयाची असून त्याचा तपशिल खाली दिला आहे. त्यासाठी ठेकेदारानी एकूण कामाचे स्वरूपाची पाहणी करून आपली दरपत्रके दिनांक २९.१२.२०२३ पर्यंत बंद लखोटयामध्ये निम्नस्वाक्षरीकारा कडे सादर करावीत. याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे...

- ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर एकूण कामाचे स्वरूप पाहून दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.
- ठेका मंजुरी आदेश प्राप्त होताच मंजूर पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली करावयाचे आहे.
- ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा एफ.नं.१/१३(१)२०१७एल एसआर दिनांक १९.०१.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेकेदाराचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.
- कामाची अदायगी महिना/काम पुर्ण झाल्यावर करण्यात येईल/ठेका संपल्यानंतर करण्यात येईल. संबंधीत देयक सादर करताना विभाग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहिल.
- ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबंधीत ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राह्य धरले जाणार नाही.
- प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधीत कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरूस्त झाल्यास दुरूस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकातून वसूल केला जाईल.
- प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- ठेकेदाराने पॅनकार्ड व बँक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बँक खाती एन.ई.एफ.टी./आर.टि.जी.एस. धनाकर्षाद्वारे करण्यात येईल.